# परिशिष्ट – एक

अ) **पालि निबंध–**

१. पञ्चसीलानि.

२. कस्सको.

३. बोधिरुक्खा.

४. मम विज्जालयो.

५. मम परिवार.

६. मय्हं गामं.

७. मयूरो.

८. धम्मराजा असोको.

९. पालिभासाय उपयोगो.

# परिशिष्ट

१. अतीते वाराणसियं ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो हिमवन्तपदेसे सीहयोनियं .........। तस्स छ कनिट्ठभातरो एका च भगिनी अहोसि, सब्बेपि कञ्चनगुहायं .........। तस्सा पन गुहाय अविदूरे रजतपब्बते एका फलिकागुहा अत्थि, तत्थे को न् ......... वसति। अपरभागे सीहानं ......... कालमकंसु। ते भगिनी सीहपोतिकं कञ्चनगुहायं ठपेत्वा गोचराय पक्कमित्वा मंसं ......... तस्सा देन्ति।

(सिंगलो, वसन्ति, अहरित्वा, निब्बत्ति, मातापितरो)

२. वासिट्ठि वेसालियं ......... निब्बति। वयपत्ता समान जातिकस्स .........दिन्ना अहोसि। सा पतिकुलं ......... सुखसवासेनवासि। सा एकं पुत्तं लभि। अपरकाले सो पुत्तो .........। तेनु सा उम्मत्तका अहोसि। सा गेहतो ......... मिथिलानगरं आगच्छि।

(पलायित्वा, कुलपुत्तस्स, कुलगेहे, गन्त्वा, कालमकासि)

३. पुनापरं यदा होमि मिथिलाय पुरुत्तमे । निमि नाम महाराजा पण्डितो .........। तदाहं ......... चतुसालं चतुमुखं। तत्थ दानं ......... मिग–पक्खि नरादीनं। अच्छादनञ्च सयनञ्च अन्नपानञ्च ......... । अब्भोच्छिन्नं ......... महादानं पवत्तयि। यथापि सेवको सामि धनहेतुमुपागतो। कायेन वाचा मनसा आराधनीयमेसति।

(करित्वान, मापयित्वान, भोजनं, कुसलत्थिको, पवत्तेसि)

**इतर काही परिच्छेदा करीता कथा–**

सोणा, एकं गामं, महापिङ्गलो राजा, अनोपमा, सुंसुमारजातक, इत्यादी विषयावर कथा पूर्ण करा।

ब) **टीपा**

१. चैत्य.

२. स्तूप.

३. धम्मपद.

४. जातक.

५. अजिंठा लेणी.

६. वेरूळ लेणी.

## नमुना बहुपर्याची प्रश्न

### १. धम्मपद

i) धम्मपदात एकुण किती गाथा आहेत?

अ) ४२५ ब) ४०० क) ४२३

ii) धम्मपद हा ग्रंथ किती वग्गात विभागलेला आहे?

अ) २६ ब) २८ क) ३०

iii) कोणत्या देशातील भिवखूना धम्मपद मुखपाठ केल्याशिवाय उसंपदा मिळत नाहीं?

अ) थायलंड ब) श्रीलंका क) ब्रह्मदेश

iv) धम्म म्हणजे काय?

अ) सदाचार ब) धर्म क) आचार

### २. जातक

i) जातक कथांची संख्या किती आहे?

अ) ५५० ब) २२० क) प४५

ii) जातक कथेत नायक कोण असतो?

अ) बोधिसत्व ब) पदमपाणि क) वज्रपाणि

iii) खुद्दक निकायाचा जातक ग्रंथ कोणत्या क्रमांकाचा आहे?

अ) १५ ब) १० क) ८

(पुढील प्रश्न संपूर्ण आणि संयुक्तसाठी उपयोगात आणता येतील)

### ३. लेणी

i) भित्ती चित्रासाठी कोणती लेणी जग प्रसिद्ध आहे?

अ) वेरूळ ब) अजिंठा क) जून्नर

ii) अजिंठा लेणीचा शोध कोणत्या इ.स. मध्ये लागला?

अ) १८१९ ब) १९२० क) १७१९

iii) वेरूळ येथे किती लेण्या आहेत?

अ) ३४ ब) ४० क) ४२

iv) डोंगरात कोरलेल्या वास्तूला काय म्हणतात?

अ) लेणी  ब) मूर्ती  क) गुहा

v) महाराष्ट्रातील कोणत्या डोंगर रांगेत सर्वाधिक लेण्या आहेत?

अ) नीलगिरी  ब) सह्याद्री  क) सातपूडा

vi) अंजिठा येथे किती लेण्या आहेत?

अ) १०  ब) २६  क) ३०

vii) औरंगाबाद जवळ कोणती लेणी जग प्रसिद्ध आहे?

अ) अजिंठा  ब) भाजेकार्ले  क) जुन्नर

### ४. स्तुप आणि चैत्य

i) चैत्यगृहात कोणाच्या समोर बसून ध्यान करायचे असते?

अ) बुद्धमुर्ती  ब) आचार्य  क) स्तुप

ii) सांची येथील काय प्रसिद्ध आहे?

अ) लेणी  ब) स्तुप  क) चौत्य

iii) सर्वात मोठे कोरलेले चैत्यगृह कोठे आहे?

अ) अजिंठा लेणी  ब) कान्हेरी लेणी  क) भाजेकार्ले लेणी

# परिशिष्ट दोन–व्याकरण (संपूर्ण व संयुक्तसाठी)

## १. नामरूपावली

### ‘धम्म’ अकारान्त पुल्लिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | धम्मो | धम्मा |
| दुतिया | धम्मं | धम्मे |
| ततिया | धम्मेन | धम्मेहि, धम्मेभि |
| चतुत्थी | धम्माय, धम्मस्स | धम्मानं |
| पञ्चमी | धम्मा, धम्मस्मा, धम्मम्हा | धम्मेहि, धम्मेभि |
| छट्ठी | धम्मस्स | धम्मानं |
| सत्तमी | धम्मे, धम्मस्मिं, धम्मम्हि | धम्मेसु |
| आलपन (संबोधन) | धम्म, धम्मा | धम्मा |

बुध्द, पुत्त, रुक्ख, बालक, सावक इत्यादी रूपे ‘धम्म’ अकारान्त पुल्लिंग या प्रमाणे होतात.

### ‘वन’ अकारान्त नपुसकलिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | वनं | वना, वनानि |
| दुतिया | वनं | वना, वनानि |
| ततिया | वनेन | वनेहि, वनेभि |
| चतुत्थी | वनाय, वनस्स | वनानं |
| पञ्चमी | वना, वनस्मा, वनम्हा | वनेहि, वनेभि |
| छट्ठी | वनस्स | वनानं |
| सत्तमी | वने, वनस्मिं, वनम्हि | वनेसु |
| आलपन (संबोधन) | वन | वना, वनानि |

धन, पाप, उदक, सील, चीवर, लोचन, हिरञ्ञ, दान, सोत ओदन, सोपान इत्यादी शब्द ‘वन’ या प्रमाणे होतात.

### ‘भिक्खु’ उकारान्त पुल्लिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | भिक्खू | भिक्खू, भिक्खवो |
| दुतिया | भिक्खुं | भिक्खू, भिक्खवो |
| ततिया | भिक्खूना | भिक्खूहि, भिक्खूभि |
| चतुत्थी | भिक्खूनो, भिक्खूस्स | भिक्खूनं |
| पञ्चमी | भिक्खूना, भिक्खूस्मा, भिक्खूम्हा | भिक्खूहि, भिक्खूभि |
| छट्ठी | भिक्खूनो, भिक्खूस्स | भिक्खूनं |
| सत्तमी | भिक्खूस्मिं, भिक्खूम्हि | भिक्खूसु, भिक्खूसु |
| आलपन (संबोधन) | भिक्खू | भिक्खू, भिक्खवे, भिक्खवो |

सेतु, गुरु, भानु इत्यादी शब्द ‘भिक्खू’ प्रमाणे होतात.

### ‘लता’ आकारान्त स्त्रीलिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | लता | लता, लतायो |
| दुतिया | लतं | लता, लतायो |
| ततिया | लताय | लताहि, लताभि |
| चतुत्थी | लताय | लतानं |
| पञ्चमी | लताय | लताहि, लताभि |
| छट्ठी | लताय | लतानं |
| सत्तमी | लतायं, लताय | लतासु |
| आलपन (संबोधन) | लते | लता, लतायो |

माला, सुजाता, विमला, गाथा, मेत्ता, विसाखा, इत्यादी ‘लता’ प्रमाणे होतात

### प्रथम पुरूष वाचक सर्वनाम ‘अम्हं’

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | अहं | मयं, अम्हे, नो |
| दुतिया | मं, मम | अम्हाकं, अम्हे, नो |
| ततिया, पञ्चमी | मया, मे | अम्हेहि, भि, नो |
| चतुत्थी, छट्ठी | मम, मय्हं, ममं, मे | अम्हेहि, भि, नो |
| सत्तमि | मयि | अम्हं, भि, नो |

### द्वितीय पुरूषवाचक सर्वनाम ‘तुम्ह’

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | त्वं, तुवं | तुम्हे, वो |
| दुतिया | त्वं, तुवं, तं, तवं | तुम्हे, वो |
| ततिया, पञ्चमी | तया, त्वया, ते | तुम्हेही, तुम्हेभि, वो |
| चतुत्थी, छट्ठी | तव, तुय्हं, तुम्हं, ते | तुम्हांक, वो |
| सत्तमि | त्वयि, तयि | तुम्हेसु |

### ‘य’ पुल्लिंग सर्वनाम

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | यो | ये |
| दुतिया | यं | ये |
| ततिया | येन | येहि, येभि |
| चतुत्थी | यस्स | येसं, येसानं |
| पञ्चमी | यस्मा, यम्हा | येहि, येभि |
| छट्ठी | यस्स | येसं, येसानं |
| सत्तमी | यस्मिं, यम्हि | येसु |

## प्रश्नार्थक सर्वनाम 'क' पुलिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | को | के |
| दुतिया | कं | के |
| ततिया | केन | केहि, केभि |
| चतुत्थी | कस्स, किस्स | केस, केसांन |
| पञ्चमी | कस्मा | केहि, केभि |
| छट्ठी | कस्स, किस्स | केस, केसानं |
| सत्तमी | कस्मिं-म्हि. किस्मिं-म्हि | केसु |

## प्रश्नार्थक सर्वनाम 'क' स्त्रीलिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | का | का, कायो |
| दुतिया | कं | का, कायो |
| ततिया | काय | काभि, काहि |
| चतुत्थी | कस्सा, काय | कासं, कासानं |
| पञ्चमी | काय | काभि, काहि |
| छट्ठी | कस्सा | कासं, कासानं |
| सत्तमी | कस्सं, कायं | कासु |

## २. धातुरुपावली

धातुविषयी काही माहिती.

१. पाली भाषेत दोन पद (प्रकार) आहेत.

१. परस्सपद (परस्मैपद) आणि २. अत्तनोपद आत्मनैपद

प्रामुख्याने पालीमध्ये परस्पदाचा उपयोग करण्यात येतो व अत्तनोपदाची रूपे कमी आढळतात. अत्तनोपद कर्मणि व कवितेत उपयोगात येतात.

२. पाली व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पाली व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालील प्रमाणे क्रम आहे.

| पालि | मराठी |
|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष |
| मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष |
| पठम पुरिस | तृतीय पुरुष |

३. काळ व अर्थवाचक काही पाली व मराठी संज्ञा पुढील प्रमाणे

| पालि | मराठी |
|---|---|
| १. पच्चुपन्नकाळ / वत्तमानकाळ | वर्तमानकाळ |
| २. हीयन्तनी / आगतकाळ | भूतकाळ |
| ३. भविस्सन्ती / अनागतो | भविष्यकाळ |

**वर्तमानकाळ (पच्चुप्पन्नकालो)**

**प्रत्यय परस्सपद**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | मि | म |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | सि | थ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | ति | अन्ति |

**'खाद' धातु - (खाणे)**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | खादामि | खादाम |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | खादसि | खादथ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | खादति | खादन्ति |

नम, गच्छ, कस, पठ, भव इत्यादी धातु 'खाद' प्रमाणे होतात.

### भूतकाळ (अतीतकाळ / हिय्यन्तनी)

**प्रत्यय परस्सपद**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | इं | इम्ह |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | इ | इत्थ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | इ | इंसु, उं |

**'गच्छ' / 'गम' धातु (= जाणे)**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | गच्छिं | गच्छिम्ह |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | गच्छि | गच्छित्थ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | गच्छि | गच्छिंसु, गच्छुं |

नम, कस, वस, पठ, लभ, कीळ इत्यादी धातु 'गच्छ' प्रमाणे होतात.

### भविष्यकाळ (भविस्सन्ती / अनागत काल)

**प्रत्यय परस्सपद**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | इस्सामि | इस्साम |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | इस्ससि | इस्सथ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | इस्सति | इस्सन्ति |

**'नम' धातु (= नमन करणे)**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | नमिस्सामि | नमिस्साम |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | नमिस्ससि | नमिस्सथ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | नमिस्सति | नमिस्सन्ति |

कस, पठ, बस, गच्छ, वद, खाद, कीळ इत्यादी धातु 'नम' प्रमाणे होतात.

# ३. संधी

## १. स्वरसन्धी :

एकामागून एक येणारे स्वर एकत्र मिळाल्यास स्वरसन्धी होते.

स्वरसन्धीचे काही नियम खालील प्रमाणे आहेत.

१) स्वराच्या पुढे स्वर आल्यास त्यांचा संधि होताना पहिल्या स्वराचा लोप होतो.

उदा. पुरिस + उत्तमो.

पुरिस + अ + उत्तमो.

पुरिस + उत्तमो.

तत्र + इमे = तत्रिमे.

अज्ज + उपोसथो = अज्जुपोसथो.

२) स्वरांपुढे 'स्व' असेल तर त्याचा संधि होताना पुढच्या स्वराचा लोप होतो.

उदा. सो + अहं.

स + ओ + अ + हं = सोहं.

सो + अपि = सोपि.

चत्तारो + इमे = चत्तारोमे.

३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास त्यांचा संधि होताना केव्हा दोहोपैकी एकाचाही लोप होत नाही.

उदा. कञ्ञा + इव.

क + ञ्ञ + आ + इ + व = कञ्ञाइव.

लता + इव = लाताइव.

केव्हा केव्हा 'लताव' आणि 'लतेव' सुद्धा होतो.

४) लोप झालेल्या स्वारापुढे 'इ' असेल तर त्या ऐवजी 'ए' होतो. 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

उदा. तस्स + इदं, तस्स + एदं = तस्सेदं.

वात + इरितं = वातेरितं.

वाम + उरू = वामोरू.

वि + उदकं = वोदकं.

५) 'इ' आणि 'उ' च्या पुढे 'अ' आला तर तो अनुक्रमे 'य' आणि 'व' होतो.

उदा. वि + अकासि.

व + इ + अकासि.

व + य + अकासि = व्याकासि.

वि + आकती = व्याकतो.

सु + आगतं.

स + उ + आगतं.

स् + व + आगतं = सागतं.

बहु + आबाधो = बह्वाबाधो.

६) 'ए' आणि 'ओ' च्या पुढे स्वर आल्यास त्यांचा क्रमाने 'य' आणि 'व' होतो.

उदा. ते + अज्ज.

त + ए + अज्ज.

त + य + अज्ज = त्यज्ज.

मे + अयं – म्यायं.

सो + अहं.

स + ओ + अहं.

स + व + अहं = साहं.

सो + अयं = सायं.

७) 'गो' शब्दाच्या पुढे स्वर आल्यास 'गो' शब्दाचा 'गव' असा आदेस होतो.

उदा. गो + अस्स.

गव + अस्स = गवस्स.

गो + एळकं.

गव + एळकं = गवेळक.

८) 'इति' शब्दाच्या पुढे 'एवं' शब्द आला असल्यास 'इति' शब्दाचा 'इत्व' असा आदेश होतो.

उदा. इति + इव = इत्व + एव.

इत्वेव = इच्चेव.

९) 'इदं' आणि 'एवं' हे शब्द पुढे आल्यास मध्ये 'य' हा आगम होतो.

उदा. मा + इदं = मयिदं.

न + इदं = नयिदं.

१०) 'छ' च्या पुढे येणाऱ्या स्वराचा केव्हा केव्हा 'ळ' होतो.

उदा. छ + अभिञ्ञा.

छ + ळ + भिञ्ञा = छळभिञ्ञा.

छ + आयतन = छळायतन.

११) केव्हा केव्हा अनुस्वाराच्या पुढे येणाऱ्या स्वराचा लोप होतो.

उदा. कतं + इति = कतन्ति, किं + इति = किन्ति.

## २) व्यञ्जन सन्धि–

१) ‘पर’ अक्षर हे जर व्यञ्जन असेल तर बहुधा पूर्व ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो.

उदा. मुनि + चरे = मुनीचरे.

माग + भारी = मागभारी.

सम्म + धम्मो = सम्माधम्मो.

२) पूर्व – शब्दातील अन्त्य अक्षर स्वर असून पर शब्दाचे पहिले अक्षर व्यञ्जन असेल तर काही वेळा त्या व्यञ्जनाचे द्वित्व होते.

उदा. प + गहो = पग्गहो.

दु + कतं = दुक्कतं, दुक्कटं.

३) ‘ए’ तसेच ‘ओ’ नंतर कोणताही वर्ण आल्यास काहीवेळा ‘ए’ आणि ‘ओ’ दोघाचाही ‘अ’ होतो

उदा. सो + सीलवा = ससीलवा.

एसो + धम्मो = एसधम्मो.

याचके + आगते = याचकमागते.

## ३) निग्गहीत सन्धि–

१) काही वेळा निग्गहीता (अनुस्वारा) चा आगम होतो तो आगम मित्रवत असतो.

उदा. चक्खु + उदपादि = चक्खुं उदपादि.

त + खणे = तंखणे.

२) काही वेळा निग्गहीताचा लोप होतो.

उदा. बुद्धानं + सासनं = बुद्धान सासनं.

एवं + अहं = एवाहं.

कथं + अहं = कथाहं.

३) निग्गहीतापुढे स्वर आल्यास काही वेळा निग्गहीताचे ‘म’ ‘य’ तसेच ‘द’ असे आदेश होतात.

उदा. तं + अहं = तमहं.

तं + इदं = तयिदं.

तं + अलं = तदलं.

# ४. समास

भाषेत जेव्हा दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन व्याकरणदृष्ट्या एक शब्द होतो तेव्हा त्याला समास किंवा सामासिक ‘शब्द’ असे म्हणतात. असे समास हे अभिजात भाषांचे वैशिष्ट्य होय. पालि भाषेमध्ये समासांचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) द्वन्द (द्वन्द्व) समास.
२) तप्पुरिस (तत्पुरुष) समास.
३) बहुब्बीहि (बहुव्रीहि) समास.
४) अव्ययीभाव (अव्ययीभाव) समास.

## १) द्वन्द समास –

दोन अथवा जास्त शब्दातील ‘च’ (आणि) चा लोप करून जो समास तयार होतो त्याला ‘द्वन्द’ समास असे म्हणतात. यामध्ये सर्व शब्द सारख्याच महत्त्वाचे असतात. द्वन्द समास दोन प्रकारे आहेत.

अ) समाहार द्वन्द समास, ब) इतरेतर द्वन्द समास.

### अ) समाहार –

दोन संज्ञा समासात येऊन ‘च’ ने जोडल्यावर अर्थ प्रगट करतात आणि एक समाहाराचा (समूहाचा) बोध करतात तेव्हा तो समाहार द्वन्द्व समास होतो हा समास नपुंसकलिंगी असतो.

| | | |
|---|---|---|
| उदा. | मुखं च नासिका च | मुखनासिकं. |
| | गीतं च वादितं च | गीतवादितं. |
| | युगं च नङ्गलं च | युगनङ्गलं. |
| | डंसो च मकसो च | डंसमकसं. |
| | विज्जा च चरणं च | विज्जाचरणं. |
| | दासि च दासो च | दासिदासं. |
| | कण्हो च सुक्को च | कण्हसुक्क. |

### ब) इतरेतर –

जेव्हा समासातील दोन्ही पदे प्रधान असतात तेव्हा त्यास इतरेतर द्वंद्व समास म्हणतात. हा समास नित्य बहुवचनी असून शेवटच्यापदाचे लिंग हे त्या संपूर्ण समासाचे लिंग असते.

| | | |
|---|---|---|
| उदा. | चन्दिमा च सुरियो च | चन्दिमसुरिया. |
| | समणो च ब्राम्हणो च | समणब्राम्हणा. |
| | माता च पिता च | मातापितरो. |
| | पिता च पुत्तो च | पितापुत्ता. |

## २) तप्पुरिस (तत्पुरूष) –

तत्पुरूष समासाचे प्रकार पुढील प्रमाणे होतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभत्ति तत्पुरूष. | २. | कर्मधारय. |
| ३. | द्विगु. | ४. | मज्झिमपदलोपी. |
| ५. | नञतप्पुरिस. | ६. | अलुत्ततप्पुरिस. |
| ७. | उपपदतप्पुरिस. | | |

**विभत्तितत्पुरिस (विभक्ती तत्पुरूष)–**

दुतिया तप्पुरिस

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | गामं | गतो | गामगतो. |
| | देसं | गतो | देसगतो. |
| | बन्धनं | गतो | बन्धनगतो. |

**ततिया तप्पुरिस–**

दुतिया तप्पुरिस

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | बुध्देन | भासतं | बुध्दभासितं. |
| | पितुना | सदिसो | पितुसदिसो. |

**चतुत्थी तप्पुरिस–**

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | संघाय | भत्तं | संघभत्तं. |
| | कुण्डलाय | सुवण्णं | कुण्डलसुवण्णं. |
| | रजनाय | दोणि | रजनदोणि. |
| | नहानाय | जलं | नहायजलं. |

**पञ्चमी तप्पुरिस–**

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | चोरस्मा | भयं | चोरभयं. |
| | पापस्मा | मुत्तो | पापमुत्तो. |
| | मुसावादा | विरति | मुसावाद विरती. |

**छट्ठी तप्पुरिस–**

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | रुक्खस्स | साखा | रुक्खसाखा |
| | धञ्ञस्स | रासि | धञ्ञरासि. |
| | रञ्ञो | पुत्तो | राजपुत्तो. |
| | रञ्ञो | पुरिसो | राजपुरिसो. |
| | मगधानं | राजा | मगधराजा. |

**सत्तमी तप्पुरिस–**

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | संसारे | दुक्खं | संसारदुक्खं. |
| | जले | कीळा | जलकीळा. |
| | आकासे | गमनं | आकासगमनं. |
| | अकाले | मेघो | अकालमेघो. |

२) **कम्मधारय –** जेव्हा समासातील दोन्ही घटक एकाच विभक्तीत असतात (समानाधिकरण) तेव्हा कर्मधारय समास होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | महन्तो | पुरिसो | महापुरिसो. |
| | मुखंचन्दो | विय | मुखचन्दो. |
| | पञ्ञा सुरियो | विय | पञ्ञासुरियो. |
| | विज्जा एव | धन | विज्जाधनं. |
| | बुध्दोसो येव | आचरियो | बुध्दघोसाचरियो. |

३) **द्विगु –** जेव्हा कम्मधारय समासाचे पहिले पद संख्यावाचक असते तेव्हा दिगु समास होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | दस | सीलानि | दससीलानि. |
| | एको | पहारो | एकप्पहारो. |

४) **मज्झिपदलोपि** – कर्मधारय समासात दोन पदांना जोडणारे पद जेव्हा गाळले जाते तेव्हा मज्झिमपदलोपि समास होतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. | गन्धेन | मिस्सित | तेलं | गन्धतेलं. |
| | पिट्ठिया | उग्गतो | पासाणो | पिट्ठिपासाणो. |

५) **नञ तप्पुरिस** – जेव्हा नकारवाचक किंवा निषेधवाचक अव्ययाचा नामाशी समास होतो तेव्हा त्याला नञ तप्पुरिस समास म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | न | मनुस्सो | अमनुस्सो. |
| | न | कालो | अकालो. |
| | न | पण्डितो | अपण्डितो. |
| | न | वसलो | अवसलो. |
| | न | ब्राम्हणो | अब्राह्मणो. |
| | धम्मस्स | विरूद्धो | अधम्मो. |
| | संसयस्स | अभावो | असंसयो. |

६) **अलुत्त तप्पुरिस** – या प्रकारात पहिल्या पदाचा विभक्ती प्रत्यय तसाच राहतो, त्याचा लोप होत नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | परस्स | पदं | परस्सपदं. |
| | अन्ते | वसति | अन्तेवासि. |
| | उदके | चरन्ति | उदकेचरा. |

७) **उपपद तप्पुरिस** – जेव्हा समासाचे दुसरे पद धातुसाधित असते आणि ते स्वतंत्रपणे वापरता येत नाही तसेच समासाचा विग्रह केला असता त्या धातूसाधित पदाचे क्रियापदात रूपांतर होते. तेव्हा उपपद तप्पुरिस समास होतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. | फले | जायति | इति | फलजं. |
| | कुम्भं | करोति | इति | कुम्भकारो. |
| | धनं | ददाति | इति | धनदो. |
| | धम्मं | जानाति | इति | धम्मञ्ञू. |

३) **बहुब्बीही समास** – ज्यावेळी दोन किंवा अधिक पदांचा समास तयार तो संपुर्ण समास दुसऱ्याच एखाद्या नामाचे किंवा अर्थाचे विशेषण होतो व त्याविषयी माहिती सांगतो त्यावेळी बहुब्बीहि (बहुव्रीहि) समास म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| उदा. | बहूनि धनानि यस्स सो | बहुधनो. |
| | जितानि इंद्रियानि यस्स सो | जितिन्द्रियो. |
| | लम्बा कण्णा यस्स सो | लम्बकण्णो. |
| | समानं उदरं यस्स सो | सोदरियो. |
| | मना सेट्ठा एतेसं इति | मनोसेट्ठा. |
| | उदकं पीयते अस्मिं इति | उदापान. |

४) **अव्ययीभाव** – जेव्हा समासाचे पहिले पद अव्यय आणि दुसरे नाम असते तेव्हा संपुर्ण समास अव्यय होतो म्हणून त्याला अव्ययीभाव समास म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | दिने | दिने | पटिदिनं. |
| | वस्से | वस्से | अनुवस्सं. |
| | नगरा | बहि | बहिनगरे. |
| | कम्मं | अनतिकम्मं | यथाकम्मं. |
| | गंगाय | समीप | उपगंगं. |

# ५. विशेषण व अव्यये

## धातुसाधित विशेषणे व अव्यये

### १. कर्मणि भूतकाळ वाचक धातुसाधित, विशेषणे–

| | | |
|---|---|---|
| दा – दिन्नं. | कर – कतं. | वच – वुत्त. |
| पूज – पूजित. | पति+ट्ठा – पतिट्ठितं. | ठा–ठितं. |
| सं+तुस – सन्तुट्ठ. | गम – गत. | दिस – दिट्ठ. |
| प+इस – पेसित. | पत – पतित. | कुप – कुपित. |
| चिन्त – चिन्तित. | आक्चर – आचरित. | प+वत – पवत्त. |
| नस – नट्ठ. | परि+क्चज – परिच्चत्त. | वि+सु – विस्सुत. |
| लभ – लध्द. | आ+किर – आकिण्ण. | इच्छ – इच्छित. |
| लज्ज – लज्जित. | अधि+गम – अधिगत. | नद – नदित. |
| पठ – पठित. | लिख – लिखित. | ञा – ञात. |
| अनु+भु – अनुभूत. | खाद – खादित. | पोस – पोसित. |
| अलं+कर – अलंकत. | | |

### २. कर्मणि विध्यर्थ धातुसाधित विशेषणे –

| | |
|---|---|
| दा – दातब्ब. | वच – वत्तब्ब. |
| रख – रक्खितब्ब. | वत – वत्तितब्ब. |
| अनु+सर – अनुसरितब्ब. | चर – चरितब्ब. |
| कर – कातब्ब, कत्तब्ब. | पूज – पूजनीय. |
| गम – गन्तब्ब. | |

### ३. त्वान्त, ल्यबन्त अव्यये –

| | | |
|---|---|---|
| दा – दत्वा. | सु – सुत्वा. | गम – गन्त्वा, गन्तान. |
| वच – वत्वा. | नि+सिद – निसिदित्वा. | प+खिप – पक्खिपित्वा. |
| आ+गम – आगन्त्वा. | दिस – दिस्वा, दिस्वान. | आ+हर – आहरित्वा. |
| हन + हन्त्वा, हत्वान. | पत – पतित्वा. | ठा – ठत्वा. |
| पुच्छ – पुच्छित्वा. | वन्द – वन्दिता. | प+ठा – पट्ठाय. |
| मर – मरित्वा. | ञ – ञत्वा, जानित्वा. | आ+सनी – आनेत्वा. |
| परि+चञ – परिच्चजित्वा. | चर – चरित्वा. | आ+दा – आदाय. |
| वस – वसित्वा. | प+विस – पविसित्वा. | नि+कम – निक्खमित्वा. |
| सं+आ+गम – समागन्त्वा. | | |

पालीमध्ये ‘त्वा’ प्रमाणेच ‘त्वान’ हा प्रत्यय लावूनही पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यये तयार होतात.

हेत्वर्थक अव्यये (तुमन्ते)

| | |
|---|---|
| दा – दातुं. | कर – कातुं. |
| वच – वत्तुं. | आ+गम – आगन्तुं. |
| उप+लं+कम – उपसंकमितुं. | उप+गम – उपगन्तुं. |
| सिक्ख – सिक्खितुं. | अव+ओ+लिक – ओलोकेतुं. |
| नि+कम – निक्खमितुं. | वि+जि – विजेतुं. |

# परिशिष्ट – तीन

इयत्ता – दहावी

# तोंडी – परिक्षा

विषय – पालि (संपूर्ण) सहामाही आणि वार्षिक गुण २०/२०

सूचना १) १५–१५ विद्यार्थ्यांचा एक गट तयार करावा.

२) तोंडी परीक्षेची काठिण्य पातळी क्रमबध्द असावी.

३) तोंडी परिक्षेतील उत्तीर्णता ही स्वतंत्र असेल.

**(१) श्रवण किंवा श्रुतलेखन–** **गुण – ०५**

एका–एका गटाला तीन ओळीचे अपठितातील पालि शुध्दलेखन देणे

**(२) प्रकट वाचन–** **गुण – ०५**

विद्यार्थ्यांकडून पाठ्य घटकांच्या संदर्भ ग्रंथातील दोन गाथा अथवा लहान उतारा वाचून घ्यावा.

**(३) भाषण–** **गुण – ०५**

प्रत्येक विद्यार्थ्याला ''मम पाठसाला / उपवनं / कस्सको / रुक्खो'' इत्यादी विषयापैकी एखाद्या विषयावर सलग दोन/तीन वाक्ये पालित बोलण्यास सांगावे.

**(४) संभाषण–** **गुण – ०५**

विद्यार्थ्यांना पालित संभाषण करता यावे. त्यासाठी त्याला पालित 'तव किं नामं अत्थि? त्वं किं वग्गमज्झे सिक्खसि? तव विज्जालयस्स नामं किं अत्थि?' इत्यादी प्रकारचे प्रश्न विचारुन त्यांच्याकडून त्यांची पालित उत्तरे वदवून घ्यावीतं. ''त्वं किं वग्ग मज्झे सिक्खसि''अशाप्रकारचे प्रश्न विचारून त्यांच्याकडून त्यांची पालित उत्तरे वदवून घ्यावीत.

❖❖❖

# प्रश्नपत्रिकेचा आराखडा

## इयत्ता – दहावी  विषय – पालि (संपूर्ण)

वेळ २ तास | गुण ८०

प्रश्न –१.(अ) कोणत्याही **तीन** उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा (गद्य) — गुण – १५

१)
२)
३)
४)
५)

(ब) कोणत्याही **दोन** समूहांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा (पद्य) — गुण – ०८

१)
२)
३)
४)

प्रश्न –२.(अ) गट **एक** मधील व गट **दोन** मधील प्रश्नांची उत्तरे स्वीकृत माध्यमातून लिहा — गुण – ०८

गट – १ – गद्यावर आधारीत **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा

१)
२)
३)

गट – २ – पद्यावर आधारीत **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा

१)
२)
३)

(ब) खालीलपैकी कोणतीही **तीन** गाथा – शुध्द व पूर्ण करून लिहा. — गुण – ०६

१)
२)
३)
४)

प्रश्न –३.पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पालित **पाच** ओळीचा निबंध लिहा — (०५)

१)
२)
३)
४)

अथवा/OR/किंवा

पालित भाषांतर करा

(**पाच** ओळीचा संमत माध्यमातील उतारा-इंग्रजी/हिन्दी/मराठी)

प्रश्न -४. खालील पालि वाक्यांची घटनाक्रमानुसार फेरमांडणी करा (कोणतेही **पाच**) (०५)

१)

२)

३)

४)

५)

६)

७)

अथवा/OR/किंवा

रिकाम्या जागा भरून कथा/परिच्छेद पूर्ण करा

(सुमारे **पाच** ओळी द्याव्यात)

प्रश्न -५. (अ) कोणत्याही **एका** उताऱ्याचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा (अपठित पालि उत्तरे) (०५)

१)

२)

३)

(ब) खालील कोणत्याही **दोन (२)** वर टिपांच्या आधारे पर्याय निवडा. (०४)

१)

२)

३)

प्रश्न -६. स्थूलवाचनावर आधारीत कथात्मक किंवा वर्णनात्मक प्रश्न विचारावे (०४)

प्रश्न -७. कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे पालित लिहा. (०५)

(आठ प्रश्न गद्य - पद्यावर आधारित असावेत)

१)

२)

३)

४)

५)

६)

७)

८)

अथवा/OR/किंवा

पुढिलपैकी **पाच** अव्यय / उपपद विभक्तिंचा वाक्यात उपयोग करा

| | |
|---|---|
| १) | ५) |
| २) | ६) |
| ३) | ७) |
| ४) | ८) |

प्रश्न -८. पुढीलपैकी कोणतेही **पाच** उपप्रश्न सोडवा (१५)

(अ) रूप ओळखा (कोणतेही **तीन**)- (०३)

१) २) ३) ४) ५)

(ब) कोणतेही **तीन** समास ओळखा- (०३)

१) २) ३) ४) ५)

(क) कोणत्याही **तीन** संधी करा.- (०३)

१) २) ३) ४) ५)

(ड) कोणत्याही **तीन** चे सूचने नुसार बदल करून लिहा.- (०३)

१) २) ३) ४) ५)

(इ) कोणत्याही **तीन** जोड्या जुळवा-

१) २) ३) ४) ५)

(फ) माध्यम भाषेत शब्दांचे अर्थ सांगा (कोणतेही **तीन**)- (०३)

१)

२)

३)

४)

५)